# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नवी मुंबई सागरी नियमन क्षेत्राच्या (सीआरझेड) नियमांचे उल्लंघन करुन इमारती उभारल्याबाबत

**(१) ७१७ (२३-१२-२०१४). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सागरी नियमन क्षेत्राच्या (सीआरझेड) नियमांकडे दुर्लक्ष करत सिडकोने बहुचर्चित पामबीच मार्गासह शहरातील खाडी किनारी असलेल्या उपनगरामध्ये वाटप केलेल्या अनेक भुखंडावर उभ्या राहिलेल्या सुमारे १०० हून अधिक इमारती सीआरझेड नियमाचे उल्लंघन करुन उभ्या आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा ठिकाणी भुखंड वाटप करुन गृहसंकुले उभी करण्यास कोणी परवानगी दिली,

(३) शासनाने याबाबत कोणते निर्णय घेतला आहे अथवा घेण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) ते (३) प्रस्तुत प्रकरणी सीआरझेड क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी (MCZMA) ची नियमानुसार आवश्यक ती पूर्व संमती न घेतल्याच्या कारणास्तव नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील इमारतींच्या बांधकाम प्रस्तावास MCZMA ने दिनांक २५/६/२०१३ च्या पत्रान्वये कार्योत्तर मंजूरी देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने बांधकाम प्रकल्पांना कार्योत्तर संमती देण्यासंदर्भात एक सविस्तर प्रस्ताव दिनांक २८/६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयास सादर केलेला आहे. सदर पत्रात महानगरपालिकेने संबंधित बांधकाम प्रकल्पांविषयी MCZMA ची पूर्व संमती न घेण्याची विशद केलेली कारणे पाहता सीआरझेड क्षेत्रात मोडणाऱ्या भूखंडाचा तपशील स्पष्टपणे दिसेल अशा योग्य प्रमाणाचे कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लानचे नकाशे महानगरपालिकेकडे दिनांक १/०३/२०११ नंतरच उपलब्ध

होणे हे एक प्रमुख कारण असल्याने महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडून प्रसतुत प्रकरणी पुढील निदेश प्राप्त झाल्यानंतर त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्यातील मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांत वीस टक्के छोटी घरे राखीव ठेवण्याच्या निर्णयातून पुनर्विकासासाठी आलेल्या सोसायटीना वगळण्याचा निर्णय घेण्यात आल्याबाबत**

**(२) २२२९ (२३-१२-२०१४). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एक एकरपेक्षा अधिक क्षेत्रफळापेक्षा मोठया गृहनिर्माण प्रकल्पांत वीस टक्के छोटी घरे राखीव ठेवण्याचा निर्णयातून पुनर्विकासासाठी आलेल्या सोसायटीना वगळण्याचा निर्णय घेण्यात आला होता, परंतू यामुळे सर्वसामान्य लोकांना परवडणा-या घरांची उपलब्धता निर्माण होणार नाही, असे माहे नोव्हेंबर, २०१४ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य लोकांना अल्प दरातील लहान घरे उपलब्ध करुन देण्याबाबतीत शासन काय धोरण अवलंबणार आहे, त्याच्या तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) ते (३) राज्यातील दशलक्ष वा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिनांक ८.११.२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये Inclusing Housing चे विनियम अंतर्भूत केलेले आहेत. सदर विनियमानुसार ४००० चौ.मी. वा त्यापेक्षा जास्त क्षेत्राच्या निवास प्रकल्पामध्ये मूळ अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकाच्या २० % च्या मर्यादेत ३० ते ५० चौ.मी. आकाराच्या सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/कमी उत्पन्न गटाकरीता बांधून हस्तांतर करणेबाबत तरतूद आहे.

सदर तरतुदीमधून ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये विद्यमान सर्व सदनिकांचे चटई क्षेत्र ८० चौ.मी. पेक्षा अधिक नाही अशा सहकारी गृहनिर्माण संस्थाना वरील तरतूदी लागू न करण्याबाबत अंतिम निर्णय झालेला आहे.

शासनाने मुंबई महानगर प्रदेशातील, बृहन्मुंबई व नवी मुंबई महानगरपालिका तसेच माथेरान नगरपालिका वगळता इतर नियोजन प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिनांक ७.८.२०१४ च्या अधिसूचनेन्वये परवडणाऱ्या घरांबाबत विकास नियंत्रण विनियम अंतर्भूत केलेले आहेत. त्यानुसार ४००० चौ.मी. वा त्यापेक्षा जास्त क्षेत्राच्या खाजगी भूखंडावर परवडणारी घरे योजना राबविता येणार असून त्यामधूनही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/कमी उत्पन्न गटाकरीता घरे उपलब्ध होणार आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये नगर रचना योजनांच्या तरतूदीमध्ये सुधारणा करणेत आलेल्या आहेत. त्यानुसार नगर रचना योजनेखालील परियोजना क्षेत्राच्या १० % मर्यादेपर्यंतचे क्षेत्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/कमी उत्पन्न गटाच्या गृहबांधणीसाठी उपलब्ध होणार आहे.

बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील म्हाडाच्या वसाहतींच्या विकासाबाबतच्या विनियम ३३(५) मध्ये सुधारणा करणेत आलेल्या असून म्हाडाने त्यांच्या हिश्श्यासाठी अधिमूल्य स्वीकारणेचा पर्याय रद्द करणेत आलेला असून त्याऐवजी सदनिकांच्या स्वरुपात बांधीव क्षेत्र स्वीकारणे बंधनकारक केलेले आहे.

विशेष नगर वसाहतींच्या नियमामध्येही सुधारणा प्रस्तावित असून त्यामध्येही परवडणारी घरे उपलब्ध होतील अशी संकल्पना अंतर्भूत केलेली आहे.

---

**मुंबई शहरातील न.भू.क्र.४०३/सी-३ व्हिलेज कांजुरमार्ग भांडुप (पश्चिम) येथील महानगरपालिका नियमानुसार विकासकाने नागरी सुविधांसाठी भूखंड देण्याबाबत**

**(३) ६५२३ (०६-०७-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील न.भू.क्र.४०३/सी-३ व्हिलेज कांजुरमार्ग भांडुप (पश्चिम) येथील महानगरपालिका नियमानुसार विकासकाने नागरी सुविधांसाठी भूखंड सोडण्यात येऊन या भूखंडाचे महानगरपालिकेस हस्तांतरण करून कार्यवाही करण्याचे व वेगळे मालमत्ता पत्रक देखील बनविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांतर्फे सदर नागरी सुविधा या भूखंडावर होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भांडुपमधील विविध धर्माच्या प्रार्थनेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आमदार निधीतून विकसित करण्यासाठी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) व (२) न.भू.क्र.४०३/सी-३ मौजे कांजुर धारण करणारा भूखंड विशेष औद्योगिक क्षेत्रामध्ये वसलेला असून त्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने औद्योगिक वापर ते रहिवास/वाणिज्य वापर रुपांतरणास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस जवळपास ७४१.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा सुविधा भूखंड उपलब्ध होणार आहे. तथापि सदर सुविधा भुखंड अद्यापपर्यंत विकासकातर्फे महापालिकेस हस्तांतरण करण्यात आलेला नसल्याने महापालिकेच्या नावे वेगळे मालमत्ता पत्रक झालेले नाही.

(३) होय,

तथापि, स्थानिक निकड विचारात घेवून सदर भूखंड उद्यान या कारणासाठी राखून ठेवण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरामधील नाना चौकातील पाटील वाडी येथील पुनर्विकासाबाबत**

**(४) ८१४४ (०७-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामधील नाना चौकातील पाटील वाडी येथील पुनर्विकासाबाबत स्थानिक रहिवाशांमध्ये कॅम्पाकोलाची पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त केली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्विकासातील इमारतीच्या नियमितीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) मे. देशभूषण को ऑ.हौ.सो. यांनी भूकर क्र.६५४, मलबार हिल विभाग या भूखंडावर बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(७) खाली पुनर्विकासाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केलेला होता. सदर आराखड्यामध्ये पुनर्विकसित इमारत क्र.१ व विक्री घटक इमारत क्र.२ या दोन इमारती समाविष्ट आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुनर्विकसित इमारतीस दिनांक २१.१०.२००४ रोजी प्रारंभ प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर पुनर्विकसित इमारत क्र.१ चे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तथापि काही अटींची पूर्तता झालेली नसल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १८.११.२०१३ रोजी पाटीलवाडीच्या रहिवाश्यांची तक्रार प्राप्त झाली. त्यानुसार सदर भूभागापैकी ४८० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूभाग हा या भूभागाच्या शेजारील मातृमंदिर को.ऑ.हौ. सोसायटीने अधिकचे बांधकाम केल्याबद्दल दंडात्मक कारवाईस्वरुप बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात यावा, असे तत्कालिन महापालिका आयुक्तांच्या आदेशात नमूद करण्यात आलेले होते. तथापि, सदर भूखंड महापालिकेस हस्तांतर केल्याची कोणतीही कागदपत्रे आढळून येत नाहीत. तसेच मालमत्ता पत्रकामध्ये सध्याच्या मालकाचे नाव नमूद करण्यात आलेले आहे. दरम्यानचे कालावधीत विकासकाने पुनर्विकसित इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका १६५३/२०१४ दाखल केलेली होती. मा.उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या आदेशानुसार संबंधित तक्रारदार, विधी खाते, सहाय्यक आयुक्त डी विभाग, वास्तूविशारद व विकासक यांचेसमवेत संयुक्त बैठका घेण्यात आल्या. त्यानुसार ४८० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड व त्यावरचे चटई क्षेत्र हे प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत राखून ठेवण्याचा व रहिवाश्यांच्या पुनवर्सनासाठी बांधलेल्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेणेत आला. सदर इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

सदर भूभागावरील ४८० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूभाग व त्यावरील अनुज्ञेय चटई क्षेत्र राखून ठेवल्यामुळे एकुण भूभागावरील अनुज्ञेय चटई क्षेत्राचे उल्लंघन न होण्याबाबतची योग्य ती काळजी घेण्यात आलेली आहे. त्यामुळे रहिवाशांमधील कॅम्पोकोलाची पुनरावृत्ती होण्याची भिती निरर्थक आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगपालिकेच्या जुन्या हद्दीचा विकास आराखडा (ड्राफ्ट प्लॅन) प्रसिध्दीबाबत**

**(५) ८३४० (०६-०७-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगपालिकेच्या जुन्या हद्दीचा विकास आराखडा (ड्राफ्ट प्लॅन) प्रसिध्द झाला आहे, या विकास आराखड्यास सुमारे ८७ हजार लोकांनी हरकती नोंदविल्या असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हरकतीची सुनावणी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आराखड्यास अंतीम मंजूरी देतांना या हरकतीची दखल शासन घेणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५.२.२०१५ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारुप विकास योजनेवर विस्तृत प्रमाणात हरकती व सूचना महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या होत्या. सदर प्रारुप विकास योजनेमध्ये आरेखनाच्या चुकासंह इतरही चुका मोठ्या प्रमाणवर झालेचे निदर्शनास आलेवरुन शासनाने प्रारुप विकास योजनेतील चुकांची सखोल शहानिशा करुन, त्यानुरुप दुरुस्ती करुन सुधारित प्रारुप विकास योजना पुर्नप्रिसध्द करणेचे निदेश दिनांक २३.४.२०१५ रोजी दिलेले आहेत. त्यामुळे सदर प्रारुप विकास योजनेवर प्राप्त झालेल्या हरकतींबाबत कार्यवाही करणेची बाब आता राहीली नाही.

---

**वरोरा नगरपरिषदतील (जि.चंद्रपूर) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निवृत्ती विषयक देणी देण्याबाबत**

**(६) ८६५६ (०६-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा नगरपरिषदतील (जि.चंद्रपूर) सेवानिवृत्त कर्मचा-यांची निवृत्ती विषयक देणी देण्याकरिता "विशेष बाब" अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१), (२) व (३) नगर परिषद वरोराची सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती नंतरच्या तद्अनुषंगिक लाभाची एकुण रकम रुपये २५५.०० लक्ष इतकी आहे. सन २०१४-१५ या वर्षात नगर परिषदेची मालमत्ता व पाणीपट्टी कराची वसुली ९०% चे वर झालेली असल्यामुळे जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या दिनांक २५/०५/२०१५ च्या आदेशानुसार रुपये १.९० लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानुसार १३ व्या वित्त आयोगाच्या निधी अंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रुपये १२९.८६ इतकी सेवानिवृत्ती विषयक देणी नगर परिषदेने प्रदान केली आहे. या व्यतिरिक्त रुपये २०.९१ लक्ष इतकी रक्कम करमणूक कर, मुद्रांक शुल्क व नगर परिषद फंडातून या प्रयोजनासाठी देण्यात आली आहे.

---

## मुंबईतील पंडीत रमाबाई मार्ग व न्यायमूर्ती सिताराम पाटणकर मार्गावरील अजिंक्य मेन्शन इमारतीचा पुनर्विकास करतांना मुंबई महानगरपालिकेने दिलेली परवानगी सदोष असल्याचे व अनियमितता झाल्याबाबत

**(७) १०५८६ (०८-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पंडीत रमाबाई मार्ग व न्यायमूर्ती सिताराम पाटणकर मार्गावरील सिटी सर्व्हे नं.४०९ व ४१० अजिंक्य मेन्शन इमारतीचा पुनर्विकास करतांना मुंबई महानगरपालिकेने दिलेली परवानगी सदोष असल्याचे व अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :** (१) ते (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीमध्ये सकृतदर्शनी अनियमितता आढळून येत असल्याने सदर परवानगी अधिनियमातील तरतूदीनुसार रद्द करुन नियमानुसार नव्याने प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यासाठी विकासक/वास्तूविशारद यांना निदेश द्यावेत असे शासनाने दिनांक २३.१२.२०११ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस निदेश दिलेले होते.

प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मृदस्तर चाचणीची (Piling C.C.) परवानगी देणेत आलेली होती, जोत्याचे बांधकामास परवानगी देणेत आलेली नव्हती. तथापि विकासकाने जागेवर बांधकाम चालू केल्याचे निदर्शनास आलेने महानगरपालिकेने विकासकाम दिनांक ३०/६/२०११ रोजी नोटीस बजावलेली होती. त्यानुसार विकासकाने मृदस्तर चाचणी व्यतिरिक्त केलेले काम पूर्ववत करुन बंद केलेले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १४.३.२०१२ रोजी प्रश्नाधीन इमारतीच्या पुनर्विकास प्रस्तावास दिलेली परवानगी रद्द केलेली आहे. तद्नंतर पुनर्विकासाचा कोणताही प्रस्ताव मान्य केलेला नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) स्थानिक पालिका प्रशासनाने गेल्या तीन वर्षात मिळालेले यात्राकर अनुदानातून यात्रेकरुंच्या सोयीबाबत**

**(८) ११११८ (०६-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) स्थानिक पालिका प्रशासनाने गेल्या तीन वर्षात मिळालेले यात्राकर अनुदानातून यात्रेकरुंच्या सोयीव्यतिरिक्त इतर कामांवर खर्च करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदरचा निधी इतर कोणत्या कामावर खर्च करण्यात आला आहे तसेच यांस जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातील पडोली पोलीस चौकीला पोलीस स्टेशनचा दर्जा देण्याबाबत**

**(९) १३५०४ (०७-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातील पडोली पोलीस चौकीला पोलीस स्टेशनचा दर्जा दिनांक ४ फेब्रुवारी, २०१४ ला गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ ३१११/प्र.क्र.१०७(अ)/पुबां२/पोल२/पोल३ अन्वये देण्यात आले असतांना अद्यापही पोलीस स्टेशनला मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याचे आणि नवीन पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर शहरात १५६ आणि घुग्गुस येथे ७८ अशी एकुण २३४ पोलीस अधिकारी /कर्मचाऱ्यांकरिता निवासी इमारत मंजूर असल्याचे मा.गृह राज्यमंत्री यांचे कपासू-०९१३/प्र.क्र.-३३०/पोल-७, दि.१७ नोव्हेंबर, २०१३ आणि कपासू - ०५१३/प्र.क्र.१७२/१३/पोल-७, दि.२९ जून, २०१३ अन्वये स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :** (१) गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये पडोली पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असून सदर पोलीस ठाण्यासाठी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची ६५ पदे मंजुर करण्यात आली आहेत. पडोळी पोलीस ठाण्याच्या हद्दनिश्चितीची अधिसूचना दिनांक २३.०७.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आली असून सदर पोलीस ठाण्याचे कामकाज पोलीस चौकीच्या इमारतीस वाढवून दि.२६.०१.२०१६ पासून सुरु करण्यात आले आहे.

पोलीस ठाणे पडोलीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याकरीता भूमापन क्र. २८ मधील ७१, ७२, ७३, ७४ जमीन मिळण्याबाबत जिल्हास्तरावर महसुल विभागाकडे पाठपुरावा चालु आहे.

(२) व (३) चंद्रपूर शहरात पूर्वी १५६ निवासस्थाने बांधण्याचे प्रस्तावित होते. परंतु सन २०१५-१६ मध्ये १५६ निवासस्थान रद्द करुन चंद्रपूर पोलीस मुख्यालय परिसरात ३६४ निवासस्थान मंजुर करण्यात आले असून सदर बांधकामाची निविदा प्रक्रिया पार पडलेली आहे. सदरचे बांधकाम पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत होणार आहे.

पोलीस ठाणे घुग्गुस येथे अधिकाऱ्याकरीता ०५ व कर्मचाऱ्यांकरीता ७३ असे एकूण ७८ निवासस्थान बांधवयाचे प्रस्तावित असून महसूल खात्याच्या ताब्यात असलेली मौजा घुग्गुस मपान क्र.२९ मधील ०२ हेक्टर आर जमीन निवासस्थान बांधण्याकरीता मिळण्याबाबत जिल्हास्तरावर महसुल विभागाकडे पाठपुरावा चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद येथे रस्ता रुंदीकरणाबाबत**

**(१०) १७१८९ (०३-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे रस्ता रुंदीकरणासाठी मोहिम राबवून शहरातील १४ रस्त्यांचे रुंदीकरण केले आहे परंतु या रस्त्यांवरील विद्युत खांब न काढल्यामुळे रुस्ता रुंदीकरण झाला नाही तसेच विद्युत खांब काढण्याचे पैसे खर्च कोण करणार या वादामुळे तीन वर्षापासून रस्त्यांवरील विद्युत खांब हटविण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शहरातील विद्युत खांब रस्त्यांमधून हटविण्याबाबत शासनाने निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत १५ रस्त्यांवरील विजेचे खांब स्थंलातरीत करावयाचे होते. त्यापैकी ७ रस्त्यांवरील विजेचे खांब स्थंलातरीत करण्याची काम पूर्ण झाली आहेत.

उर्वरीत ८ रस्त्यांवरील पोल व डी.पी.स्थंलातरीत करण्याचे प्रलंबित आहे. यासाठी महानगरपालिकेने जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडे निधी मिळण्याकरिता प्रस्ताव सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**सिडकोने द्रोणागिरी नोड येथे बांधलेले पोलीस ठाणे वापरात नसल्याबाबत**

**(११) १९८४५ (१२-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडकोने द्रोणागिरी नोड येथील फुंडे कॉलेज समोर मागील दहा वर्षांपूर्वी अत्याधुनिक सुसज्ज असे लाखो रूपये खर्चुन बांधण्यात आलेले पोलीस ठाणे अद्यापही वापरात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलिस ठाणे अद्यापपर्यंत सुरू न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त पोलिस ठाणे तातडीने सुरू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) द्रोणागिरी से. १३ येथे सिडको प्रशासनाकडून नियोजित द्रोणागिरी पोलीस ठाण्यासाठी बांधलेली इमारत पोलीस खात्याकडे वर्ग करण्याबाबत तसेच इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी सिडको प्रशासनाकडे पाठपुरवा करण्यात येत आहे.

---

**गोंदिया शहरामध्ये पार्कींग झोन स्थापित करण्याबाबत**

**(१२) २६२९३ (११-०८-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया शहरामध्ये वैशिष्टपूर्ण योजनेअंतर्गत पार्कींग झोनसाठी शासनाने जागा उपलब्ध केली असून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पार्कींग झोन उभे करण्याकरीता गोंदिया महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती कार्यवाही केली जात नसल्याने शहरामध्ये वाहतूक कोंडी व वाहतूक अव्यवस्थेने सर्व सामान्य जनता त्रस्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोंदिया शहरामध्ये पार्कींग झोन उभे राहण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सद्य:स्थितीत काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :** (१) गोंदिया शहरामध्ये वैशिष्टपूर्ण योजने अंतर्गत पार्कींग झोनसाठी शासनाने जागा उपलब्ध करुन दिली असून त्या करीता रु.८० लक्ष इतका निधी योजनेसाठी मंजुर झालेला आहे.

(२) पार्कींग झोन उभे करण्याबाबतची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३) गोंदिया शहरा मध्ये वाहतुकी मध्ये कोंडी होवू नये या करीता शासनाने पोलीस ठिकाणच्या मागणी जागा पार्कींग करीता देणे बाबत शासनाने आदेश निर्गमित केलेले आहेत. नझुल शिट नं. ३०, प्लॉट नं.११, मधील १४५३ चौ.मी. जागा वाहनतळासाठी नरपरिषदेला मंजुर केलेली आहे. सदर जागावर म.प्रा.व न.र अधि.१९६६ चे कलम ३७(२) फेरबदल ची कार्यवाही पुर्ण झाली आहे.
(४) सदर कार्य प्रगतीपथावर आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेने इमारतीचे खालचे मजले अधिकृत असले तरी अतिरिक्त मजले अवैध असल्याने संपूर्ण इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नसल्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१३) २८३८० (२१-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने इमारतीचे खालचे मजले अधिकृत असले तरी वरचे (अतिरिक्त) मजले अवैध असल्याने संपूर्ण इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणार नसल्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायद्याच्या अज्ञानामुळे अनधिकृत घरे खरेदी करणाऱ्या घरमालकांना संरक्षण देणे तसेच सदर अनधिकृत बांधकामे होऊच नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबतीत माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वेगळा निर्णय घेतला नसून, सदर बाबतीत अस्तित्वात असलेल्या धोरणानुसार वरचे मजले विनापरवाना अथवा अवैध असतील तर सदर मजल्यांचे निष्कासन झाल्याशिवाय अथवा त्या मजल्यांची वैधता सिध्द झाल्याशिवाय त्याखालील अधिकृत मजल्यांना भोगवटा प्रमाणात दिले जात नाही.
(२) अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी महापालिकेच्या २४ प्रशासकीय विभागांत ६४ पदनिर्देशित अधिकारी नेमण्यात आले असून, सदर अनधिकृत बांधकामांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीरामपूर (जि. अहमदनगर) येथील शहरातील रस्त्याची झालेली दुरावस्था

**(१४) २९९६८ (२२-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि. अहमदनगर) येथील शहरातील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असुन हे रस्ते बुजविण्याची मागणी नागरिक तथा लोकप्रतिनिधी यांनी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंधवणी रोडवरील वॉटर सप्लायसमोरील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्याची दुर्दशा झाल्याने अनेक अपघात होत आहेत असे असुनही संबंधित याबाबत आवश्यक उपाययोजना करीत नसल्याने नागरिकांचे प्रामुख्याने वाहनचालकांचे व प्रवाशांचे जीवन धोक्यात आले आहेत हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) श्रीरामपूर नगरपरिषद हद्दीत रस्त्यावरुन होणाऱ्या अतिरिक्त वाहतुकीमुळे तसेच भुयारी गटार योजनेचे काम सुरु असल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडले आहेत. परंतु नगरपरिषदेच्या वतीने रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम प्राधान्याने करण्यात येत आहे.

---

## पुणे येथील लोहगाव येथे पोलीसांसाठी उभारण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पातील सदनिकेसाठी पोलीसांना मुद्रांक शुल्क व अन्य कर माफ करण्याबाबत

**(१५) ३०४४० (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील लोहगाव येथे पोलीसांसाठी उभारण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पातील नोंदणी केलेल्या सदनिकेसाठी पोलीसांना मुद्रांक शुल्क व अन्य कर माफ करावे ही पोलीसांची मागणी मा. मुख्यमंत्र्यांकडे पोचवून ती मान्य करणासाठी प्रयत्न करीन असे आश्वासन मा. गृह राज्यमंत्री यांनी दिले असल्याचे माहे, ऑगस्ट २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आश्वासनानुसार पोलीसांची उपरोक्त मागणी मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१), (२) व (३) लोहगाव पुणे येथील पोलीसांसाठी उभारण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पातील सदनिकांसाठी मुद्रांक शुल्क माफ/कमी करण्याचा प्रस्ताव प्रचलित तरतुदीनुसार तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### मुंबईमध्ये डी.सी.आर नियमांमुळे महापालिकेच्या शाळांचा पुनर्विकास रखडल्याबाबत

**(१६) ३०८७८ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये ४५३ इमारतीमध्ये महापालिकेच्या एक हजार १२४ शाळा भरतात, त्यापैकी अनेक शाळांची दुरावस्था झाली असून पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत आहेत. परंतू "डी.सी.आर." नियमांमुळे शाळांचा पुनर्विकास रखडलेला असून सदरील शाळांचा पुनर्विकास मार्गी लागावा यासाठी "डी.सी.आर." नियमांमध्ये बदल करण्याची मागणी विविध स्थानिक स्तरावरून होत असल्याची बाब दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "डी.सी.आर." नियमांमध्ये बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २९.१०.२०१५ रोजीचे पत्रान्वये महानगरपालिका शाळांच्या बांधकामाच्या संदर्भात शासनाचे ४० % किमान क्षेत्र क्रिडांगणासाठी एका ठिकाणी राखीव ठेवणेबाबत दिनांक २४.२.२०१४ रोजीचे जे निदेश आहेत त्यामध्ये शिथिलता अपेक्षिलेली आहे.

(२) व (३) शाळांसाठी क्रिडांगणाचे क्षेत्र प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सरसकट महानगरपालिकांच्या शाळांना अशी सवलत दिल्यास खाजगी शाळांच्या संदर्भातही अशी मागणी होवू शकते.

शासनाच्या दिनांक २१.२.२०१४ रोजीच्या निदेशामध्ये विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात विद्यमान शैक्षणिक इमारतीचे विस्तार करणे अगत्याचे असेल तर अशा अपवादात्मक परिस्थितीत भूखंडामधील मोकळी जागा कमी करण्यासाठी शासनाचे पूर्व मान्यता घेवून शैक्षणिक इमारतीच्या बांधकामासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करता येईल अशी तरतूद आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडून प्रकरणनिहाय प्रस्ताव प्राप्त झालेस त्याबाबत शासनाकडून उचित कार्यवाही होवू शकेल.

---

### राज्यात दरोडेखोर, संघटीत गुंड, नक्षलवादी यांच्याशी लढताना पोलीसांचा मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(१७) ३११५७ (२१-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरोडेखोर, संघटीत गुंड, नक्षलवादी यांच्याशी लढताना पोलीसांचा मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना पोलीसांच्या मोफत कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी संबंधित विभागाकडून पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) होय, याबाबत पोलीस महासंचालकांकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
(२) व (३) या संदभ्रात प्रचलित तरतुदी तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### राज्यातील सेवानिवृत्त झालेल्या पोलीसाच्या निवासस्थानांची समस्या सोडविण्याबाबत

**(१८) ३२१४४ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या पोलीसांना शासकीय निवासस्थानात भाडे भरुन कायमस्वरुपी राहण्यास मुदतवाढ देणे, राज्यातील जुन्या व मोडकळीस आलेल्या चाळीत वास्तव्य करणा-या पोलीसांना मोफत व हक्काची घरे देण्याबाबत तसेच सेवानिवृत्त पोलीसांना दरमहा केवळ ७,००० ते ८,००० रुपये पेन्शनपोटी मिळत असल्याने ते राहत असलेल्या घराचे भाडे कमी करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) तसेच सदरहू प्रस्तावांवर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१), (२), (३) व (४) (अ) दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ च्या गृह विभागाच्या शासन निर्णयानुसार ठराविक मर्यादेपर्यंत मुदतवाढ देण्यात येते.
(ब) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अधिकारी किंवा कर्मचारी यांना मोफत व हक्काची घरे मिळण्याबाबत सध्या शासनाचे कोणतेही धोरण नाही.
(क) सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या घराचे भाडे कमी करण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

### पुणे शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत

**(१९) ३३२५० (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन (एस.आर.ए.) प्रकल्प संथ गतीने चालू असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळेच शहर झोपडपट्टीमुक्त होण्याऐवजी झोपडपट्टीतील समस्या अधिकच बिकट होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र कार्यालयासाठी नगर विकास विभागाने दि.११.०९.२०१४ रोजी विशेष नियमावली प्रसिध्द केली आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस गती देणेसाठी मा.मंत्री, गृहनिर्माण यांचेकडे दि.०१.०७.२०१५ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र कार्यायाकडून आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील बावधन खुर्द सर्व्हे क्र.५५ च्या नकाशातील टपाल कार्यालयाच्या आरक्षित जागेचे स्थलांतर उद्यानाच्या आरक्षित जागेवर करण्यात आल्याबाबत

**(२०) ३३२५७ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला मतदारसंघातील पुणे महापालिकेच्या बावधन खुर्द सर्व्हे क्र.५५ च्या नकाशातील टपाल कार्यालयाच्या आरक्षित जागेचे स्थलांतर उद्यानाच्या आरक्षित जागेवर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उद्यानाच्या आरक्षित जागेत टपाल कार्यालयाचे आरक्षण टाकल्यामुळे उद्यानाचे क्षेत्र अरुंद झाले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर टपाल कार्यालयाचे आरक्षण वारंवार महापलिकेकडून बदलले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी महापालिका आयुक्तांनी आरक्षण बदलताना त्यांच्या अधिकाराचा चुकीचा वापर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वारंवार टपाल कार्यालयाचे आरक्षण बदलण्याचे कारणे काय आहेत,
(६) असल्यास टपाल कार्यालयाचे आरक्षण रद्द करण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) होय.
(२) टपाल कार्यालय या आरक्षणाच्या स्थलांतरणामुळे उद्यानाच्या आरक्षणाचे आकारमानात फरक झालेला असून उद्यानाचे क्षेत्रफळ मात्र कायम ठेवण्यात आले आहे.

(३), (४), (५) व (६) दोनदा सदर आरक्षण संबंधित जमिन मालकांच्या विनंतीवरुन त्यांचेच क्षेत्रात २०० मी. परिघ अतरांमध्ये महानगरपालिका आयुक्तांनी विकास नियमावलीचे नियम क्र. १४.४.१ नुसार दोन वेळा त्यांना असलेल्या स्वेच्छधिकारात स्थलांतरीत केले आहे. टपाल कार्यालयाचे आरक्षण बदलण्यासंदर्भात शासनास प्राप्त निवेदने विचारात घेऊन महानगरपालिका आयुक्तांनी घेतलेला निर्णय योग्य होता किंवा कसे, याबाबत स्वतंत्र कार्यवाही करण्यात आलीअसून शासनाने पत्र क्र.टिपीएस-१८१६/प्र.क्र.४४७/१६/नवि-१३, दि.०७/०७/२०१६ अन्वये महानगरपालिका आयुक्तांना त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यास कळविले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलडाणा) येथील पोलीसांकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देणेबाबत**

**(२१) ३३२७२ (२१-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलडाणा) येथील पोलीस स्टेशन, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस यांच्या करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांचे कडून शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस स्टेशनची इमारत फार जुनी झाली असून नवीन पोलीस प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर प्रस्तावास तत्काळ मंजुरी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) होय.
(२) बुलढाणा जिल्हा पोलीस दलाअंतर्गत उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि पोलीस स्टेशन खामगाव ग्रामीण उप विभाग, खामगाव येथे प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव सुधारीत दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रक व नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागविण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावांना निधीची उपलब्धता लक्षात घेवून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई भायखळा येथील वीर माता जिजाबाई भोसले उद्यानाच्या प्राणी संग्राहलयाच्या विस्ताराबाबत**

**(२२) ३३६४० (२१-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई भायखळा येथील वीर माता जिजाबाई भोसले उद्यानाच्या प्राणी संग्रहालयाच्या विस्तारासाठी उद्यानाच्या जागेलगत असलेल्या मफतलाल मिलचा सीएसक्र.५९१ व १/५९१ मधील ७७२२.४७ चौ.मी. क्षेत्राचा राखीव भूखंडाची किंमत करारानुसार मफतलाल मिलला अदा करुन सदर भूखंड त्वरीत ताब्यात घेण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव नगरविकास आणि मा. आयुक्त, मुंबई महानरपालिका यांना दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे याबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ई विभागाच्या मंजूर पुनर्रचित विकास आराखड्यानुसार माझगांव विभागातील न.भू.क्र. ५९११/५९१ धारण करणारी जमीन "वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणी संग्रहालयाचा विस्तार" या सार्वजनिक उद्दिष्टाकरिता आरक्षित आहे.

सदर जमिन निवासी पट्टयात वलेलली असून, सदर जमिन शीतगृह, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन विभागाचे उपकेंद्र व बहुमजली अनिवासी गाळे इत्यादींनी भारित आहे.

न.भू.क्र. ५९१, १/५९१ हा मफतलाल मिलचा भाग नाही, तसेच, सदर जमिनीचे मालक हे मफतलाल नसून, सदर जमिनीचे मालक श्री.महेंद्र राजीव छेडा व इतर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १२७(१)  खरेदी सूचना बजावली आहे.

सदर भूखंड संपादन करुन ताब्यात घेण्याच्या उद्देशाने सदर प्रस्ताव सुधार समितीने ठराव क्र. ११२, दि. २९.१०.२०१५ व महानगरपालिका ठराव क्र. १०५५, दि. ०३.११.२०१५ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

त्यानुषंगाने सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई जिल्हा यांच्याकडे अधिसूचना जारी करुन भूसंपादन करण्याकरिता दिनांक १६.१२.२०१५ रोजी पाठविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन, नगररचना विकास योजना अथवा प्रादेशिक योजनेसाठी आरक्षित जमिनी दहा वर्षाच्या कालावधीत संपादित न केल्यास मुळ मालकास परत करण्याची तरतुद असल्याबाबत**

**(२३) ३४४६१ (२१-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन, नगररचना विकास योजना अथवा प्रादेशिक योजनेसाठी आरक्षित जमिनी दहा वर्षाच्या कालावधीत शासनाने भूसंपादनाची कार्यवाही केली नसेल तर सदर जमिनी जमिन मालकाच्या नोटीशीनंतर संबंधित जमिनीचे १२ महिन्यात आरक्षण रद्द

करण्याच्या तरतुदीला शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत राज्यातील किती जमीन मालकाच्या जमिनीचे आरक्षण रद्द करुन त्यांना जमिनी परत करण्यात आल्या आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :** (१) ते (३) अशी बाब नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ मध्ये सदर अधिनियमांतर्गत तयार करणेत आलेल्या विकास योजनेमधील आरक्षित असलेली जमीन दहा वर्षाचे कालावधीमध्ये संपादित करणेसंदर्भात अधिनियमाच्या कलम १२६(२) व १२६(४) खाली घोषणापत्र झालेले नसेल तर जमीन मालकांस नियोजन प्राधिकरणावर नोटीस बजावणेची तरतूद आहे. अशी नोटीस बजावलेनंतर १२ महिन्याचे कालावधीमध्ये नियोजन प्राधिकरणाने त्याबाबत कार्यवाही न केल्यास सदर जमिन आरक्षणामधून व्यपगत होणेची तरतूद आह. शासनाने दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ रोजी अध्यादेश प्रख्यापित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमामध्ये सुधारणा केलेल्या होत्या. त्यानुसार उक्त उल्लेखिलेला १२ महिन्याचा कालावधी २४ महिने इतका वाढविलेला आहे. दिनांक ३१.२.२०१५ रोजी अध्यादेशाचे कायद्यामध्ये रुपांतर झालेले आहे.

---

**अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापुर नगरपालिकेने भुखंड ८१/१ असतांना त्याला ७/१ दर्शवून नियमाचे उल्लंघन केल्याबाबत**

**(२४) ३८७३५ (२१-०१-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील मुर्तिजापुर नगरपालिकेने भुखंड ८१/१ असतांना त्याला ७/१ दर्शवून नियमाचे उल्लंघन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणामध्ये नगरपालिकेने शासनाची परवानगी घेतली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू जागेचा महसूल शासनाकडे जमा केला आहे काय,
(४) असल्यास, शासनाचा महसुल बुडविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, त्याचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मुर्तिजापूर नगरपरिषदेच्या हद्दीत आरक्षण क्र. ३९ हे मुर्तिजापूर शहराच्या सुधारित विकास आराखड्यात दुकान समुहाकरीता आरक्षित आहे. सदरची जागा ही नगर परिषदेच्या ताब्यात असून या जागेवर दुकानाचे बांधकाम करण्यासाठी शासनाची परवानगी घेतली असल्याचे नगर परिषदेने नमुद केले आहे. सदर प्रकरणी पूर्व उत्तर मधील नझुल प्लॉट

क्र. ७/१ वर आरक्षित जागेवर शासनाच्या मंजूरीप्रमाणे दुकानाचे बांधकाम करण्यात आले आहे. याप्रकरणी नझुल प्लॉट क्र. ७/१ वर दुकान बांधकामाबाबत न्यायालयाचा स्थगनादेश असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोलीस कर्मचाऱ्यांना शासन निर्णयान्वये निवासस्थाने मिळण्याबाबत**

**(२५) ३८९३६ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस शिपायांना ३६६ चौ. फुटांचे व पोलीस हवालदारांपासून पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत ४७३ चौ. फुटांचे निवासस्थान दि. २ जून, २००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुरविणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस दलाकडे सद्यस्थितीत असलेली बहुतांश निवासस्थाने १८० ते २२० चौ. फुटांची आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शासन निर्णयान्वये पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने मिळण्याबाबत तसेच उपलब्ध निवासस्थानांचे चौ. फुटांप्रमाणे घरभाडे आकारण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) होय. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २ जून, २००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन गटनिहाय शासकीय निवासस्थानांचे चटई क्षेत्र विहीत करण्यात आलेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सद्य:स्थितीत नवीन बांधकाम प्रकल्पांमध्ये जास्त क्षेत्रफळाच्या सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे. सद्य:स्थितीत पोलीस कर्मचारी/अधिकारी यांच्या वेतनश्रेणीनुसार घरभाडे भत्ता आकारण्यात येतो.

---

**मुंबईमध्ये निवासी व व्यापारी इमारत उभारताना विकास नियंत्रण नियमावलीनुसार वीज उपकेंद्र उभारण्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्या नसल्याबाबत**

**(२६) ३८९४१ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये निवासी व व्यापारी इमारत उभारताना विकास नियंत्रण नियमावलीनुसार वीज उपकेंद्रासाठी विकासकाने जमीन राखून ठेवणे बंधनकारक असताना, बेस्ट प्रशासनाने सन २००६ ते २०१० या कालावधीत इमारतीमध्ये वीज उपकेंद्रांना जागाच दिली नाही, २७५ ठिकाणी

उपकेंद्राची आवश्यकता नाही, तर प्रत्यक्षात १३८ ठिकाणी उपकेंद्राची आवश्यकता असतानाही बेस्टने ना हरकत प्रमाणपत्र दिल्याने बेस्टचे ४०२ कोटीचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करणा-या बेस्ट अधिका-यांवर तसेच विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) अशी बाब नाही.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम क्र. २६ मधील तरतुदीनुसार वीज वितरण करणाऱ्या प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार विकास करणेत यावयाच्या भूखंडामध्ये, भूखंडाचे क्षेत्रानुसार वीज उपकेंद्र ठेवणेची तरतूद आहे. वीज वितरण करणाऱ्या प्राधिकरणास आवश्यकता नसेल तर वीज उपकेंद्राची तरतूद केली जात नाही.

बेस्ट उपक्रमाने सन २००६ ते २०१० या पाच वर्षामध्ये विकासकाकडून प्राप्त झालेल्या एकूण ५१९ प्रकरणांपैकी १९७ प्रकरणांमध्ये उपकेंद्राची मागणी केली व उर्वरित ३२२ प्रकरणांमध्ये उपकेंद्राची मागणी केली नाही. नवीन उपकेंद्र आवश्यक नसल्याकारणाने त्यांची उभारणी करण्यात आली नाही. त्यामुळे बेस्ट उपक्रमाचे नुकसान झालेले नाही.
(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास आराखड्याचे नियोजन करताना पुरनियंत्रण रेषेला बगल दिल्याबाबत

**(२७) ४०००५ (१७-०५-२०१६). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र विभागीय शहर नियोजन कायद्यानुसार जेव्हा एखादी महानगरपालिका शहर विकास आराखडा तयार करते तेव्हा त्या विकास आराखड्यामध्ये पूरनियंत्रण रेषेचा अंतर्भाव करणे बंधनकारक असतांना मुंबई महानगरपालिकेने सन २०१५ मध्ये सादर केलेल्या विकास आराखड्यात पूरनियंत्रण रेषेचा उल्लेख केलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास आराखड्याचे नियोजन करताना मिठी, दहिसर, ओशिवरा, पोईसर अशा ४ नद्यांसाठीच्या पुरनियंत्रण रेषेचा उल्लेख नसल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे मुंबईत पुन्हा २६ जुलै सारखी पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नद्यांच्या पुरनियंत्रण रेषा अवलंबण्यासाठी शासनाद्वारे महापालिका प्रशासनाला आदेश देण्यात आले आहे काय,
(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) व (२) सर्वसाधारणपणे मुंबई बाहेरील नद्यांचे प्रवाह हे नैसर्गिक असून त्यांना सरंक्षक भिंती बांधून त्यांच्या पात्रांचे सीमांकन केले जात नाही. त्यामुळे पावसाळ्यात अतिवृष्टीच्या वेळी नदीचे पाणी पात्रांबाहेर आसपासच्या परिसरामध्ये पसरुन पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने, त्याप्रमाणे पूर नियंत्रण रेषा निश्चित केली जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये जागेच्या कमतरतेमुळे नद्या व नाले यांचे रुंदीकरण व खोलीकरण हे सल्लागारानी अभ्यास करुन केलेल्या शिफारशीनुसार करुन पात्रांच्या दोन्ही बाजूला उच्चतम भरतीच्या पातळीपर्यंत आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधून प्रवाहाचे नियंत्रण केले जात असल्याने विकास आराखड्यामध्ये पूर नियंत्रण रेषेची संकल्पना अंतर्भूत नाही.
(३) सन २००५ मध्ये दिनांक २६ व २७ जुलै रोजी मुंबई शहराला अतिवृष्टीचा तडाखा बसून एका दिवसात ९४४ मि.मी. इतक्या विक्रमी पावसाची नोंद होऊन मुंबई शहर व उपनगरामध्ये पुर सदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. सल्लागारांनी अभ्यास केल्याप्रमाणे इतक्या तिव्रतेची अतिवृष्टी शतकातून एकदा होत असते. त्यामुळे अशा अपवादात्मक परिस्थितीसाठी पर्जन्य जलवाहिन्यांची क्षमता ९४४ मि.मी. इतक्या विक्रमी पर्जन्यमानासाठी वाढविणे आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य व मुंबई सारख्या विकसित शहरामध्ये जागेची उपलब्धता विचारात घेता शक्य होणार नाही. परंतु अशा परिस्थितीमध्ये पूरपरिस्थितीमध्ये नियंत्रण मिळविण्यासाठी विविध उपाययोजना बृहत आराखड्यामध्ये सूचविलेल्या असून त्यांची अंमलबजावणी बृहमुंबई महानगरपालिकेकडून टप्प्याटप्याने करण्यात येत आहे.
(४) ते (६) लागू नाही.

---

**दींडनेर्ली व रेंदाळ (जि.कोल्हापुर) येथील भारत राखीव बटालीयन क्र.३ प्रकल्पचे काम कोल्हापुर जिल्ह्याबाहेर सुरू करण्याबाबत**

**(२८) ४००३० (२०-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दींडनेर्ली व रेंदाळ (जि.कोल्हापुर) येथील राज्य राखीव दलातील भारत राखीव बटालीयन क्र.३ प्रकल्पासाठी गावातील ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे हा प्रकल्प कोल्हापुर जिल्ह्याबाहेर सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची तयारी जिल्हापरिषद कोल्हापुर यांनी दर्शवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१६) :** (१), (२), (३) व (४) भारत राखीव दलातील बटालीयन क्र. ३ हा प्रकल्प कोल्हापूर जिल्हयाबाहेर नेण्याचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

---

**रायगड जिल्हयातील पोलीस दलातील रिक्त पदांबाबत**

**(२९) ४१२९५ (२०-०५-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पोलीस विभागासाठी श्रेणी १ ते ४ मधील एकूण मंजूर पदे किती आहेत व त्या पैकी किती पदे रिक्त आहेत,

(२) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१६) :** (१) रायगड जिल्हयातील पोलीस विभागात वर्ग-१ ची ४२ पदे, वर्ग-२ ची ४४ पदे, वर्ग-३ ची २७०७ व वर्ग-४ ची ३६ पदे अशी एकूण २८२९ पदे मंजूर आहेत आणि त्यापैकी वर्ग-१ ची ९ पदे, वर्ग-२ ची ११ पदे, वर्ग-३ ची ३६९ पदे, वर्ग-४ ची १६ पदे अशी एकूण ४०५ पदे रिक्त आहेत.

(२) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही विविध स्तरावरुन चालु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथील “रेडेमहाल” या ऐतिहासिक ईमारतीच्या झालेल्या दुरवस्थेबाबत**

**(३०) ४१३७४ (१६-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथील “रेडेमहाल” हया ऐतिहासिक ईमारती जवळ बालेकिल्ल्यात गडावरील प्रमुख व्यक्तीस किंवा किल्लेदार अथवा राजांच्या भेटीस येणाऱ्या पाहुण्यांचे विश्रांतीचे ठिकाण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेच्या ताब्यात असलेली ही ईमारत जनता बझार या सहकारी संस्थेला लोकांची सोय व्हावी या उद्देशाने नाममात्र भाड्याने देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ईमारती वरून नगरपरिषद व जनता बझार यांच्यात गेली २० वर्षापासून वाद सुरु असून या काळात जनता बझार व नगरपरिषद प्रशासनाकडून ईमारत पूर्ण दुर्लक्षित झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या ऐतिहासिक ईमारतीचे दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी मा.न्यायालयाचा आदेश पारीत झाला असून दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादींनी घेवू नये असे आदेश आहेत.

---

**खामगाव (जि.बुलडाणा) येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देणेबाबत**

**(३१) ४१४८२ (२७-०५-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलडाणा) येथील पोलीस स्टेशन, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव कडून शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस स्टेशनची इमारत फार जुनी झाली असून नवीन पोलीस प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर प्रस्तावास तत्काळ मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) व (२) खामगांव, जि.बुलढाणा येथील पोलीस स्टेशनकरीता नवीन प्रशासकीय इमारतींच्या बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याची कार्यवाही पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली (जि.सांगली) येथील काळी खण तलावाचे सुशोभिकरण करणेबाबत**

**(३२) ४१५७३ (१९-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली, जिल्हा सांगली येथील काळी खण तलावाचे सुशोभिकरण करण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) व (२) अंशत: हे खरे आहे.
सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडे सादर केला असून त्यांचे निर्देशानुसार खर्चाच्या हिश्याबाबत महानगरपालिकेत धोरणात्मक निर्णयाबाबत सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापनाबाबत**

**(३३) ४१५९४ (१३-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापनाकरिता हरित न्यायालयाने तज्ज्ञांची कार्यकारी समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीच्या निगराणीखाली व जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प राबविण्याबाबत महापालिकेस सूचित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने अधिकार नसतानाही या समितीस समांतर दुसरी अशी प्रशासन व पदाधिकाऱ्यांची समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर सुकाणू समिती ही मा.हरित न्यायालयाने स्थापन केलेल्या तज्ञ समितीस पूरक अशी समिती असून या समितीच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामध्ये लोक सहभाग वाढविणे अपेक्षित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली (जि.सांगली) येथील वखारभाग येथे अद्‌ययावत ट्रक टर्मिनल उभारणेबाबत**

**(३४) ४१५९५ (१३-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील वखारभाग या ठिकाणी अद्‌ययावत ट्रक टर्मिनल उभारणीबाबतचा प्रस्ताव मागील अनेक दिवसापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे नेमके स्वरुप काय आहे व त्यासाठी किती निधीची तरतुद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, महानगरपालिकेने या टर्मिनलकरीता किती जागा आरक्षित केली आहे,

(४) असल्यास, किती कालावधीमध्ये या प्रस्तावास मंजूरी मिळणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जेष्ठ फोटोग्राफर आनंदराव चौगुले यांनी कोल्हापूर शहरातील खरी कॉर्नर चौकामध्ये आत्महत्या केल्याबाबत**

**(३५) ४१८३५ (२०-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील खरी कॉर्नर चौकामध्ये जेष्ठ फोटोग्राफर आनंदराव चौगुले (वय ६५) यांनी गळफास लावुन आत्महत्या केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचनामा करते वेळी पोलिसांना चौगुले यांची आत्महत्ये पूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये स्थानिक माजी नगरसेवक, त्यांची मुले आणि महानगरपालिका कर्मचा-यांचा जाच आणि धमक्यांना कंटाळून आत्महत्या करत असल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कोणती करवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी जुनाराजवाडा पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू रजि. क्र. १०१/२०१५ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे मयत दाखल करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणाची चौकशी अद्याप सुरु आहे. घटनास्थळी पंचनामादरम्यान सापडलेली चिठ्ठी जप्त करण्यात आलेली असून ती यातील मयत यानेच आत्महत्येपुर्वी लिहिलेली आहे किंवा कसे ? याबाबत मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांचेकडे तपासणी होवून अभिप्राय मिळणेकामी पाठविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागात चुकीचे टीडीआर दिल्याबाबत**

**(३६) ४२३३३ (१७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागात चुकीचे टीडीआर दिल्याचा आरोप गत काही दिवसापासून महानगरपालिका मध्ये होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित नगररचना विभागात गत दहा ते पंधरा वर्षापासून असलेल्या अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी फाजलपुर, गणेश कॉलनी या विभागात दोन ठिकाणी आणि नारेगांव या एका ठिकाणी मागणीपेक्षा दुप्पट टीडीआर दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) व (२) होय खरे आहे.
(३) व (४) महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील प्रथमदर्शनी दोषी आढळून आलेल्या ५ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्यास्तव दोषारोप पत्रे बजावण्यात आली असून त्यापैकी २ अधिकारी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. उर्वरित ३ अधिकाऱ्यांना दिनांक १८.४.२०१६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. याप्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना त्यांच्याकडील चौकशी अधिकाऱ्यांमार्फत विभागीय चौकशी करण्याची विनंती महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक २.५.२०१६ चे पत्रान्वये केली आहे.

---

## नागपूर मधील मनीषनगर येथील एका १४ वर्षीय मुलाचे अपहरण करण्यात आल्याबाबत

**(३७) ४२५११ (१७-०५-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मधील मनीष नगर येथील पॉप्युलर सोसायटीत राहणाऱ्या एका १४ वर्षीय मुलाचे भर दिवसा अपहरण केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपहरण केलेल्या मुलाचा शोध घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) फिर्यादीचा मुलगा शाळेतून घरी येत असताना अनोळखी ४ ते ५ इसमांनी जबरदस्तीने पळवुन नेल्याबाबतची माहिती पोलीस स्टेशनला मिळताच मुलाचे शोधकामी तपास पथके रवाना करण्यात आली. तपास पथकांना सदर गुन्ह्यातील आरोपी मुलासह पळुन जात असल्याची माहिती मिळाल्याने त्याप्रमाणे सापळा लाऊन आरोपीला अपहरण झालेल्या मुलासह ताब्यात घेण्यात आले. पोलीस स्टेशन सोनेगाव येथे अपराध क्रमांक ०४/१६ कलम ३६३, ३६४ अ, १२० (ब), ३४ भादंवि, सह कलम ३(१) महाराष्ट्र संगठीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यामध्ये एकुण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळुरू चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील मंजूर पोलिस स्टेशन इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) ४२८९९ (१७-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळुरू चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील पोलिस स्टेशन इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) व (२) अमरावती जिल्ह्यातील मंगळूरु चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) या नवनिर्मित पोलीस स्टेशनसाठी जागा उपलब्ध नसल्याने, क्षेत्रिय कार्यालयाकडून जिल्हाधिकारी, अमरावती यांना जागा उपलब्ध होण्यासाठी कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड शहरातील पोलीस कर्मचऱ्यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३९) ४४९५७ (१६-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरातील पोलीस कर्मचऱ्यांच्या निवासस्थानांची दुरवस्था झाली असून सदर निवास्थानांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड यांच्या मार्फत वारंवार पत्रव्यवहार करण्यात येऊनही निवासस्थानांची दुरुस्ती झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या अंतिम सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) व (२) बीड शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सन २०१५-१६ मध्ये निवासी इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु.२८.३९ लक्ष आणि अनिवासी इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु.२७.४६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून दुरुस्तीची कामे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय तांत्रिक विद्यालय, सिन्नर (नाशिक) येथे + २ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रम (संगणक d-९ व इलेक्ट्रॉनिक c-२) सुरु करण्याची केलेली मागणी**

**(४०) ४५४६८ (०५-०५-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तांत्रिक विद्यालय, सिन्नर (नाशिक) येथे +२ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रम (संगणक d-९ व इलेक्ट्रॉनिक c-२) सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) शासकीय तांत्रिक विद्यालय सिन्नर या संस्थेत +२ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रम (संगणक डी-९ व इलेक्ट्रॉनिक्स सी-२) प्रत्येक १ तुकडी सुरु करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

---

**नागपूर जिल्हयातील कन्हान नगरपरिषद (नवीन) येथील कर्मचा-यांचे वेतन नगरपरिषदे अंतर्गत करण्याबाबत**

**(४१) ४५५४६ (०५-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील कन्हान नगरपरिषद (नवीन) येथील कर्मचा-यांचे माहे जानेवारी, २०१४ पासूनचे वेतन नगरपरिषदे अंतर्गत करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही. कन्हान नगरपरिषदेने कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी, २०१४ ते माहे सप्टेंबर, २०१४ पर्यंतचे वेतन ग्रामपंचायत मध्ये मिळत असलेल्या वेतनानुसार अदा करण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रती कर्मचाऱ्यांना रु.२०,०००/- अग्रिम राशी देण्यात आलेली आहे.

तसेच कन्हान पिंपरी नगर परिषदेस तसेच नवनिर्मिती नगर परिषदेस सहायक अनुदान उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील पाचोरा, पिंपळगाव हरेश्वर, भडगाव पोलिस ठाण्यामध्ये पोलिस बळ वाढविण्याबाबत**

**(४२) ४७१८७ (१६-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव तसेच पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील पाचोरा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ६५ गावे तसेच पिंपळगाव हरेश्वर पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ४८ गाव येत असून पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात पोलीस अधिकाऱ्यांसह अपुरे कर्मचारी कायदा व सुव्यवस्था पाहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणची लोकसंख्या पाहता येथील पोलिस बळ वाढविण्याबाबत नागरिकांनी वारंवार मागणी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलिस ठाण्यामध्ये पोलिस बळ वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१६) :** (१), (२) व (३) जळगाव जिल्हा घटकातील भडगाव, पाचोरा व पिंपळगाव हरेश्वर या तीन पोलीस ठाण्यात शासनाकडून मंजूर असलेल्या सर्व पदावर पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महानगर पालिका व नगरपालिकांनी केलेल्या भूसंपादनावर दाट वस्तींच्या ठिकाणी तीन पट व विरळ वस्तीच्या ठिकाणी दुप्पट विकास हक्क हस्तांतरण (TDR) देण्याबाबत**

**(४३) ४७१९७ (०५-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगर पालिका व नगरपालिकांनी केलेल्या भूसंपादनावर दाट वस्तींच्या ठिकाणी तीन पट व विरळ वस्तीच्या ठिकाणी दुप्पट विकास हक्क हस्तांतरण (TDR) देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) होय.

(२) या शासन निर्णयामुळे विकास आराखड्यामध्ये प्रस्तावीत असलेल्या आरक्षित जागा सार्वजनिक प्रयोजनार्थ महानगरपालिकांच्या ताब्यात येण्यास मदत होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहीतेच्या अमंलबजावणीकडे होत असलेले दुर्लक्ष**

**(४४) ४७७७७ (१३-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील सर्व नगरपालीका व नगरपंचायतीसाठी सन २०१४ पासून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता लागु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखा संहिते प्रमाणे अद्यापही नगरपरिषदेचे कामकाज होत नसल्याचे लेखा परिक्षणा दरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.राज्यातील सर्व नगरपालिका व नगरपंचायतीसाठी दिनांक १ एप्रिल, १९७२ पासून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ लागू होती.

उपार्जित तत्वावरील दुहेरी नोंद लेखा पध्दतीवर आधारित महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०१३ ही दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ पासून लागू करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

अद्याप पर्यंत अशी बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण महानगरपालिकेतर्फे पर्यटकांना बोटींग सफरीसाठी खरेदी करण्यात आलेली जेट-स्क्री (स्कूटर बोट) पालिका परिसरात धुळखात पडल्याबाबत**

**(४५) ४८१६३ (१७-०५-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण महानगरपालिकेतर्फे पर्यटकांना बोटींग सफरीसाठी लाखो रुपये खर्च करुन खरेदी करण्यात आलेली जेट-स्क्री (स्कूटर बोट) पालिका परिसरात धुळखात पडून असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलक्रिडा प्रकारास देशी-विदेशी पर्यटकांची मोठी मागणी असतांनाही सदर जेट स्क्री बोट धुळखात पडून राहण्यामागची कारणे काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) मालवण नगरपरिषदेकडून कोणत्याही जेट-स्क्री (स्कूटर बोट) ची खरेदी करण्यात आलेली नाही.

पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत पत्तन विभाग, सिंधुदुर्ग यांचेमार्फत एक जेट-स्क्री. (स्कूटर बोट) खरेदी करुन नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. सदरची जेट-स्क्री (स्कूटर बोट) तांत्रिक बिघाडामुळे बंद स्थितीत आहे.

(२) सदर जेट-स्क्री. (स्कूटर बोट) मध्ये चाचणी दरम्यान तांत्रिक दोष उद्‌भवल्याचे निदर्शनास आल्याने बंद स्थितीत आहे. याबाबत पत्तन विभागाकडून बोट दुरुस्त करुन घेण्याबाबत नगरपरिषदेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गुरकुंज मोझरी (जि.अमरावती) येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाचे लोकार्पण करण्याबाबत**

**(४६) ४८३९१ (१३-०५-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुरकुंज मोझरी (जि.अमरावती) येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवास सुविधेकरिता पाच वर्षापूर्वी तब्बल ७३ लाख रुपये खर्चून बांधलेल्या वसतिगृहांच्या लोकापर्णासाठी अद्यापही मुहूर्त मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव आार्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थांना मुलभूत सुविधांचा अभाव असलेल्या प्राचार्याच्या क्वार्टरमध्ये नाईलाजास्तव वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वस्तीगृह विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :** (१) होय,

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शासकीय ओद्योगिक संस्था, मोझरी, जि.अमरावती" या संस्थेच्या वसतीगृहातील सर्व मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यानंतर वसतीगृहाच्या उदघाटन वा लोकापर्णासाठी वेळ न घालवता विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेवून, जानेवरी, २०१६ पासून मुलांच्या निवासाकरीता वसतीगृह सुरु करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

संस्थेचे वसतीगृह सुरु होण्यापूर्वी प्राचार्य निवासस्थानात विद्युत व पाणी इ. सुविधा उपलब्ध असल्याने ७ गरजू विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता पर्यायी व्यवस्था करुन देण्यात आली होती.

(३) सदर वसतीगृह विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी परिसर स्वच्छता, खिडक्यांना तावदाने बसविणे, विद्युत, पाणी इत्यादी मुलभूत सुविधा, तसेच विद्यार्थ्यांकरिता पलंग, गाद्या, चादरी, उश्या, ब्लँकेट इ. सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील फुलेवाडी-रिंगरोड बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(४७) ५१६५२ (१७-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील फुलेवाडी-रिंगरोडचे बांधकाम गेली ६ ते ७ वर्षे रखडल्याने स्थानिक नागरिकांनी ४ ते ५ वेळा रस्ता रोको करुन काम पूर्ण करण्याची आयुक्त, कोल्हापूर यांचेकडे वारंवार मागणी केल्याचे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिंगरोडचे बांधकाम पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) सदर फुलेवाडी रिंगरोडचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या अंतर्गत मंजूर होऊन ते दि.१६.११.२०११ रोजी सुरु करणेत येऊन संपूर्ण रस्त्याचे १४.०० मी. रुंदीने बेसचे व ६.०० मी. रुंदीने डी.बी.एम (डांबरी स्तराचे) काम फुलेवाडी नाक्यापासून ५०० मी. सोडून पूर्ण झाले होते.

तथापि, कोल्हापूर शहरासाठीचे थेट पाणीपुरवठा योजना दि.२७.०२.२०१३ रोजी मंजूर झाली व प्रत्यक्षात दि.२२.०८.२०१४ रोजी कामास सुरुवात झाली. पाणीपुरवठा योजनेचे काम या रस्त्यावरुन करावे लागणार असलेने सदर रस्त्याचे काम प्रलंबीत ठेवणेत आले.

नागरिकांचे सोईसाठी सदर ठिकाणी पुर्वी केलेल्या ६.०० मी. रुंदीच्या डांबरी स्तरावरुन वाहतुक सुरु आहे. फुलेवाडी नाक्यापासून ५०० मी. लांबीचे ठिकाणी अर्ध्या रस्त्याचे काम पाईप लाईनच्या क्रॉसींगमुळे केलेले नाही. सद्यस्थितीत फुलेवाडी सोसा. मध्ये येणाऱ्या रस्त्यापर्यंत रस्ता जोडणेत आलेला आहे व त्यावरुन वाहतूक सुरु आहे.

पाणी पुरवठा लाईनचे काम पूर्ण झाले नंतर रस्त्याचे उर्वरीत काम करण्यात येईल.

---

**लाईन बाजार (जि.कोल्हापूर) येथील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(४८) ५१६५७ (०३-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाईन बाजार (जि.कोल्हापूर) येथील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प गेली कित्येक दिवस बंद अवस्थेत असल्याने सांडपाणी थेट नदीपात्रात मिसळत असल्याचे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प चालवणारी विश्वा इन्फ्रा कंपनी प्रकल्प अर्धवट सोडून गेल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) नाही. हे खरे नाही.

लाईन बाजार (जि.कोल्हापूर) येथील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प मधून दररोज ५० ते ५५ द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रीया केली जाते प्रक्रीया केलेले सांडपाणी काही प्रमाणात बागेसाठी वापरण्यात येते. उर्वरित पाणी पंचगंगा नदीमध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळानी दिलेल्या निकषानुसार सोडले जाते.

(२) हे खरे नाही.

प्रकल्प चालवणारी विश्वा इन्फ्रा कंपनी यांनी ८८ टक्के योजनेचे काम पूर्ण केले असून सांडपाणी प्रक्रीया केंद्र दि. ०९.०५.२०१४ पासून टप्प्याटप्प्याने चालू करुन दि. २०.०४.२०१५ पासून ७६ द.ल.लि. क्षमतेने कार्यान्वीत केला आहे. सध्या विश्वा इन्फ्रा कंपनी मार्फतच सांडपाणी प्रक्रिया केंद्र चालविला जातो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवण्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नानवीज (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(४९) ५२२६८ (२०-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नानवीज (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र इमारती ३० ते १०० वर्षापेक्षा जास्त जुन्या असल्याने सदर इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य क्रमाने निधी उपलब्ध करुन देणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त कामांबाबत मा.गृह राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार संबंधित विभागाने जे प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक होते ते प्रस्ताव शासनास सादर झाले नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज, दौंड, पुणे येथील निवासी व कार्यालयीन इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु.७,१६,४६,८२२/- आणि रु.९,६९,४८,७२५/- इतक्या दुरुस्तीच्या कामांच्या अंदजपत्रकांना मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा नगरपरिषद हद्दवाढीच्या प्रस्तावाबाबत**

**(५०) ५२७११ (१७-०५-२०१६). श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा नगरपरिषद हद्दवाढीबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी सातारा यांच्यामार्फत दिनांक १५/१२/२००२, तसेच माहे जून २००५, सप्टेंबर २००८, ऑगस्ट २०१०, जुलै २०१२, जानेवारी २०१४, व जून २०१५ मध्ये शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंवार प्रस्ताव पाठवूनही याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सातारा हद्दवाढीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.